**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८/२०२२.</u>**
**निशाणी क्र.१५ वरील आदेश**
(योगेश गणपत गुरव उर्फ सावंत वि. वैभव विष्णू गुरव उर्फ सावंत व.१५)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुळ अर्जातील सामनेवाला क्र.१२ कै. मनोज शांताराम सावंत यांचे वारस रेकॉर्डवर घेवून तशी दुरुस्ती करणेस परवागनी मिळावी याकरीता दिलेला आहे.

२. अर्जदार यांचे प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन की, यातील सामनेवाला क्र.१२ मनोज शांताराम सावंत हे दि.२०/०३/२०२४ रोजी कांदिवली मुंबई येथे मयत झालेले आहेत. सदर मयत सामनेवाला क्र.१२ यांना १२–अ) पायल मनोज सावंत व १२–ब) ओम मनोज सावंत असे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरक्त अन्य कोणीही वारस नाही. तरी न्याय पूर्ततेच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवागनी मिळावी व निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्तीस मुभा मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर सामनेवालातर्फे म्हणणे देवून मे. न्यायालयाने योग्य ते आदेश पारीत करावेत असे नमुद केलेले आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता यातील सामनेवाला क्र.१२ कै. मनोज शांताराम सावंत हे मयत असल्याचे अर्जाव्दारे कथन केले असून निशाणी क्र.१२/१ येथे त्यांचे मृत्यूदाखल्याची प्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन प्रस्तुत अर्जातील सामनेवाला क्र.१२ मनोज शांताराम सावंत हे दिनांक २०/०३/२०२४ रोजी मयत झाला असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुळ अर्जामध्ये सदर सामनेवाला क्र.१२ यांचे निधनानंतर आवश्यक पक्षकार म्हणून त्यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे तसेच मुळ अर्जाचा योग्य तो अंतिम निर्णय होणेकरिता देखील अचुक पक्षकारांची उपस्थिती आवश्यक आहे. अर्ज मंजूर केल्यास सामनेवालांचे कोणतेही नुकसान उद्भवत नाही. त्यामुळे प्रस्तुत कामातील सामनेवाला क्र.१२ मनोज शांताराम सावंत यांचे वारस म्हणून १२–अ) पायल मनोज सावंत व १२–ब) ओम मनोज सावंत अशी नावे

फैलावर घेणेस अर्जदार यांना संधी देणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.–

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.१५) मंजूर करण्यात येतो.

२. मयत सामनेवाला क्र.१२ मनोज शांताराम सांवत यांचे कायदेशिर वारस म्हणून १२–अ) पायल मनोज सावंत व १२–ब) ओम मनोज सावंत यांची नावे समाविष्ट करुन घेण्यात यावीत.

३. अर्जाप्रमाणे योग्य ती दुरुस्ती अर्जदार यांनी १४ दिवसांच्या आत करुन मुळ अर्जाची दुरुस्तप्रत दाखल करावी.

दिनांक:–०४/०९/२०२५
ठिकाण – रत्नागिरी.

**(एस. एस. हाके)**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**राजापूर.**